# पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर, यांचेकार्यालय,

मिलकॉर्नर,डॉ.बाबासाहेबआंबेडकररोड,औरंगाबाद-४३१००१.
दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३२६५२४,फॅक्सक्र.०२४०-२२४०५९६.
ईमेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

---

**गोपनिय जा.क्र.विशा-५/आदेश/औबाद/२०१९- ८५** **औरंगाबाद,दिनांक. १९/०३/२०१९**

**भारत निवडणूक आयोगाच्या, नवी दिल्ली यांचे आदेशान्वये मुद्रणावरील लोकसभा सार्वत्रीक निवडणूक - २०१९ बॅनरर्स, पोस्टर्सवर निर्बंध व अवलंबावयाच्या कार्यपध्दती बाबत.**

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम १२७ (अ) अन्वये

**आदेश :-**

ज्या अर्थी मा.भारत निवडणुक आयोग नवी दिल्ली यांनी दि.१०/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व ४८ मतदार संघातून लोकसभेचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. तसेच दिनांक.१० मार्च २०१९ ते निवडणुकीची प्रक्रिया पुर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत भारत निवडणुक आयोगाने संपुर्ण महाराष्ट्राकरिता आदर्श आचारसंहिता लागू केली आहे.

त्याअर्थी **मी, डॉ.दिपाली धाटे-घाडगे,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,औरंगाबाद शहर** लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम १२७ अ मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणुकीच्या कालावधीत बॅनरर्स, पोस्टर्स व इतर छपाई करण्यास दि.२०/०३/२०१९ ते आचारसंहिता संपेपर्यंत खालील प्रमाणे निर्बंध घालीत आहे.

१) कोणीही व्यक्ती, कोणतीही अशी निवडणूक पुस्तिका किंवा पोस्टर व ज्याच्या मुखपृष्ठावर त्याचे मुद्रणालय, किंवा प्रकाशकाचे नांव, पत्ता नाही असे मुद्रण (छपाई) करणार नाही किंवा छपाई किंवा प्रकाशन करणार नाही. परंतु मुद्रण करुन घेण्याऱ्या व्यक्तीने त्याला व्यक्तीश: ओळखत असलेल्या दोन व्यक्तींच्या स्वाक्षरीने विहीत नमुन्यामध्ये (Appendix A) अर्ज मुद्रण आस्थापनेला दोन प्रतिमध्ये सादर केल्यास अशा प्रकाशनाला/छपाईला खालील अटी व शर्तीच्या अधिनराहून मान्यता देता येणार आहे.

१. मुद्रण आस्थापनानी सर्व प्रकाशनावर नांव, पत्ता, छापण्यात येत असलेलया निवडणूक पुस्तिका, पोस्टरवर छापण्यात यावे.

२. प्रिंटींग प्रक्रियेत छापील निवडणूक पुस्तिका, पोस्टरच्या ०३ प्रती घोषणापत्र प्रकाशनाच्या ०३ दिवसांत अधिनियम १२७ - A (२) अन्वये सादर करणे बंधनकारक राहील.

३. प्रकाशकांनी ४ प्रतीत प्रिंटिंग मटेरिअल घोषणापत्रासहित प्रिंटिंग करावयाच्या ०३ दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

४. तसेच प्रिटिंग मटेरिअलच्या किती प्रती छापण्यात आल्या याबाबतची माहिती सादर करतील व त्याची अदा करावयाची किंमत इ. मा.भारत निवडणूक आयोग यांचे नमुना Appendix B मध्ये भरुन या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

५. वरील प्रमाणे मुद्रण राज्यस्तरीय असल्यास त्यांची एक मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना छपाई केल्याच्या ३ दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

६. जर वरील प्रमाणे मुद्रण जिल्हास्तरीय असल्यास त्याची एक प्रत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी छपाई केल्याच्या ३ दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

७. मुद्रण करण्यात आलेल्या दस्तऐवजाची एक प्रत नंतर कोणतीही व्यक्ती छपाई/मुद्रण/प्रकाशन आस्थापना निवडणूकीशी संबंधी पत्रके, पोस्टर्स, बॅनर्स, व इतर साहित्य छपाई/मुद्रीत/प्रकाशित करणार नाही. परंतु छपाई/मुद्रीत/प्रकाशित करावयाची असल्यास संबंधीत प्रकाशन आस्थापनेस वरील प्रमाणे अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) जो कोणी उपरोक्त अटी व शर्तीचे उल्लंघन करेल तो ०६ महिन्यापर्यंत च्या कालावधीसाठी शिक्षेस पात्र असेल किंवा रु. २००० पर्यंत दंड असेल किंवा दोन्हीस पात्र राहील. तसेच सदर तरतुदीनुसार संबंधित उल्लंघन करणाऱ्या प्रकाशकांवर परवाना रद्द करण्याबाबातची कारवाई करण्यात येईल.

४.१ प्रिटींग प्रेसमध्ये छापण्यात आलेले निवडणूक पुस्तिका, पोस्टर प्रिंटरकडून प्राप्त होताच आपण वर नमुद अधिनियमाचे पालन केले किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येईल. संबंधित प्रकाशीत नियमानुसार केलेल्या ०१ प्रती त्याच्या कार्यालयात ठेवतील जेणेकरुन राजकीय पक्ष, उमेदवार / सहकारी हे नियमाचे पालन केल्याबाबत तपासणी करता येईल.

४.२ मा. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे उल्लघंन झाल्यास पुस्तिका, पोस्टरची तपासणी करुन अधिनियम १२७ - A अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज **दिनांक.** १४/**०३/२०१९** रोजी औरंगाबाद येथे जारी करण्यात आला आहे.

**( डॉ.दिपाली धाटे-घाडगे )**
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,
औरंगाबाद शहर

<u>प्रति :-</u>

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, औरंगाबाद शहर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर
३)सर्व पो.स्टे./शाखा, प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर

<u>प्रतिलिपी :-</u>

१)विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२)जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
३)म.न.पा.आयुक्त,औरंगाबाद
४)उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, औरंगाबाद.
५)जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
६)केंद्र संचालक, आकाशवाणी, औरंगाबाद.
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा,औरंगाबाद